# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३३७ - २३ दिनांक : - ३०/०९/२०२३

## FICCI CASCADE Anti-Counterfeiting & Anti-Smuggling International Conference MASCRADE 2023– Movement Against Smuggled and Counterfeit Trade मध्ये Best Performing Officers Award 2023 मिळाल्याबाबत !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार श्री. योगेश कांतीलाल जैन, वय ३८ वर्षे, पत्ता - जे.पी.नॉर्थ, विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता.जि. ठाणे दिनांक ०४/०५/२०२२ रोजी क्रिप्टोकरन्सी गुंतवणूकीबाबत फसवणूकीची **सायबर अर्ज आवक क्र. ५८५/२०२२** अन्वये सविस्तर प्राथमिक चौकशी पूर्ण केली. सायबर गुन्हे कक्ष यांनी दिलेल्या अहवालावरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. २०५/२०२३ कलम ४२०, ३४ भादंविप्रमाणे, दिनांक १६/०३/२०२३ रोजी नोंद करण्यात आला.

मा. न्यायालयाने सायबर गुन्हे कक्षाचे सविस्तर अहवालावरुन **OKX** ला गोठविलेली वॉलेट मधील ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) रुपये मुळ तक्रारदार यांना परत देण्याबाबत सविस्तर आदेश दिले, त्याप्रमाणे दिनांक १३/०६/२०२३ रोजी मुळ तक्रारदार यांचे खात्यामध्ये ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) परत मिळालेले आहेत.

**सायबर गुन्हे कक्ष यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करुन चायना देशामध्ये बसून भारतीय नागरिकांची फसवणूक झालेली रक्कम सातत्यपूर्ण १३ महीने सातत्यपुर्ण तपास करुन मुळ तक्रारदार यांना परत मिळवून दिलेली आहे. तसेच सायबर गुन्हे कक्षाकडे प्राप्त होणारे विविध तक्रारींमध्ये/अन्वेषणामध्ये फसवणूक रक्कम परत मिळवून दिलेबाबत, संशयित आरोपी निष्पन्न करुन पोलीस ठाणेचे ताब्यात देवून गुन्हयांची उकल केलेबाबत तसेच सायबर गुन्हयांबाबत नागरिकांमध्ये जागरुकतेकरीता राबविलेल्या उपक्रमाबाबत केलेल्या सातत्यपुर्ण कामगिरीची दखल घेवून मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयातून** FICCI CASCADE Anti-Counterfeiting & Anti-Smuggling Award 2023 **या पुरस्काराकरीता नामनिर्देशन करण्यात आलेले होते.**

**सदरबाबत** International Conference: MASCRADE 2023 - Hotel ITC Maurya, New Delhi. **येथे दिनांक २८ सप्टेंबर २०२३ व २९ सप्टेंबर २०२३ रोजी दोन दिवसीय पुरस्कार वितरण सोहळाचे आयोजन करण्यात आलेले होते. नमूद कार्यक्रम श्री.अनुराग ठाकूर, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री, युवा व्यवहार व क्रिडा मंत्री, भारत सरकार,** FICCI CASCADE **चे आजी-माजी उच्च पदस्थ अधिकारी तसेच विविध देशांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत पार पडलेला आहे.**

**सदर कार्यक्रमामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री.व्हि. विश्वनाथन यांचे हस्ते मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर गुन्हे कक्षाचे प्रभारी अधिकारी पो.नि./श्री.सुजितकुमार गुंजकर यांना केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीकरीता पुरस्कार (स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र) देवून सत्कार करण्यात आलेला आहे.**

सदरची कामगिरी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा.श्री.मधूकर पाण्डेय, पोलीस आयुक्त,मा.श्री.श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त –मि.भा.व.वि.,मा.श्री.अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.,मा.श्री.अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडलेली आहे.

-----ooooo------